# मिल के चलो असोसिएशन

## ऑगस्ट, सप्टेंबर २०२४

### संस्थेच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त



९ सप्टेंबरला संस्थेला पाच वर्षे पूर्ण झाली. या पाच वर्षात बऱ्याच संस्थांचे व हितचिंतकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. प्रत्यक्ष काम करणारी टीम आणि इतर सर्व स्नेही यांमुळे संस्थेची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे असे वाटते. यावर्षी ५ व्या वर्धापन दिनानिमित्त ज्या शाळांमध्ये नियमित जात नाही पण जिथून सत्र घेण्यासाठी मागणी येत असते अशा दोन शाळांची निवड केली. त्यात स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल व डी. आर. कन्या हायस्कूल या शाळांचा समावेश होता. दोन्हीकडे डॉ. कलाम फिरती प्रयोगशाळा दाखवली व विविध वैज्ञानिक प्रयोगामगिल विज्ञान शिकण्याचा आनंद मुलांनी घेतला. या निमित्ताने स्थानिक पातळीवर शिक्षणात गुणवत्तापूर्ण काम करण्याचा प्रयत्न करत असलेल्या संस्था व व्यक्तींसोबत संपर्क झाला.

### मुलांसोबत आम्हालाही विचार करायला संधी देणारा उपक्रम

डॉ. कलाम फिरत्या प्रयोग शाळेच्या सल्लागार समितीतील सदस्य श्री. विजय मोरे सर नेहमीच संस्थेच्या कामासाठी प्रोत्साहन देत असतात. त्यांच्या शाळेत फिरत्या प्रयोगशाळेचे सत्र घेणे ही आमच्यासाठी आनंदाची पर्वणीच होती. त्यात विद्यार्थी आणि शिक्षकांचा सक्रिय सहभाग होता. सत्रानंतर माणसाचा जीव नेमका कुठे असतो?, पृथ्वी गोलच का फिरते?, थंड पाण्याच्या ग्लासच्या बाहेरील बाजूस पाण्याचे थेंब का साचतात? असे विविध प्रश्न मुलं-मुली विचारत होते. सत्रांनंतर एका शिक्षकांनी प्रतिक्रिया दिली की, " माझ्या २८ वर्षाच्या सेवेत अनेक संस्थांनी वेगवेगळे कार्यक्रम घेतले पण अशाप्रकारचा पूर्णवेळ खिळवून ठेवणारा, मुलांसोबत आम्हालाही विचार करायला संधी देणारा उपक्रम पहिल्यांदाच झाला." एक १०वी तील मुलगी म्हणाली ,"आजच्या कार्यक्रमात मंडप नाही, जेवण नाही किंवा बक्षिस वाटप नाही तरी पण आज खूप आनंद झाला कारण खूप काही नवीन शिकायला मिळालं." अशा सकारात्मक प्रतिक्रिया शिक्षक व विद्यार्थ्यांनी दिल्या.



### SCERT ची परवानगी मिळाली (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद)

जुलै महिन्यात अमळनेर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १५ शाळेतील विज्ञान शिक्षकांच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली होती. पण एस सी ई आर टी ची परवानगी नसल्यामुळे प्रशिक्षण थांबवावे लागले होते. त्यानंतर पुणे येथे गाभा समिती समोर केलेले प्रेझेंटेशन आणि इंटरव्यू प्रक्रियेत सहभाग घेतला. त्या दिवशी राज्यभरातून आलेल्या एकूण ४२ संस्थानपैकी १३ संस्थांचे प्रस्ताव मान्य करण्यात आले त्यात मिल के चलो असोसिएशन कडून सादर केलेल्या प्रस्तावाला मान्यता मिळाली. यामुळे शिक्षकांचे प्रशिक्षण सुरू करण्याचे दरवाजे पुन्हा उघडले गेले आहेत. आता शिक्षकांच्या प्रशिक्षणाला नव्याने सुरुवात होत आहे.



## सोनदरा येथील विज्ञानवेध उपक्रम

सोनदरा गुरुकुल येथे वर्ग सहावी व सातवीचे विद्यार्थी आणि विज्ञान शिक्षकांसोबत काम सुरू झाले आहे. त्यात मुख्यत: मुलांसोबत 'भौतिक राशींचे मूल्यमापन' यावर कृतीयुक्त व चर्चात्मक सत्र झाले तसेच निवडक मुलांसोबत 'दृष्टी-सातत्य' या संकल्पनेवर आधारित वैज्ञानिक प्रयोगांचे सत्र झाले. त्याचप्रमाणे शिक्षकांसोबत विज्ञान शिकवण्याची पद्धत, पूर्वतयारी, स्वतःचा अभ्यास आणि मुलांचे शिकणे अधिक रंजक करण्यासाठी कोणकोणत्या पद्धतींचा समावेश करू शकतो यावर चर्चा आणि मार्गदर्शन झाले.

## शिक्षकांचा सहभाग वाढतोय

उपक्रम राबवण्यात सहभागी असलेल्या टीम कडून विज्ञानवेध उपक्रमातील सत्रात त्या-त्या शाळेतील शिक्षकांचा सहभाग वाढावा म्हणून नियमित पाठपुरावा करण्याची रचना कार्यान्वित केली. जसे की प्रत्येक सत्राच्या आधी शिक्षकांना फोन करून सत्राची कल्पना देणे, सत्रातील कंटेंट आधीच शेअर करणे, त्यातील काही भाग घेऊ शकतील का यावर चर्चा करणे इ. या संपूर्ण प्रक्रियेस शाळेतील शिक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. सत्राचा आढावा घेणे, मुलांना दिलेल्या गृहपाठाचा पाठपुरावा करणे अशा गोष्टी करण्यात ५०% शिक्षक सहभाग घेत आहेत. नावीन्यपूर्ण प्रयोगशाळेचा वापर: नंदगावच्या शाळेतील शिक्षक जी संकल्पना सुरू आहे त्याच्याशी संबंधीत असणारे प्रयोग शाळेतील मॉडेल मुलांना दाखवतात तसेच इतर प्रयोग दाखवण्यासाठी सुद्धा प्रयोगशाळेतील साहित्याचा वापर करताना दिसतात.





## संस्थेची माहिती

- ग्रामीण भागात काम करणारी सेवाभावी, सामाजिक संस्था
- स्थापना : दिनांक ९ सप्टेंबर २०१९
- मुख्य उद्दिष्ट: ग्रामीण जीवनाच्या सर्व घटकांवर लोकांमार्फत काम करून सर्वांगीण आणि शाश्वत विकासाला चालना देणे
- 'शालेय शिक्षण' या प्रभावी माध्यमाद्वारे समाजात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील
- शाश्वत विकासासाठी 'संघटनातून विकास' या पद्धतीचा स्वीकार

## संपर्क


मो. नं. 9922991550 / 8459433145

FB: Mil Ke ChaloAssociation

ईमेल : milkechaloasso@gmail.com


**Bank : ICICI - Current Account**
**Branch : Amalner**
**Acc name : MIL KE CHALO ASSOCIATION**
**ACC NO - 179505005172**
**IFSC - ICIC0001795**

**संस्थेस मिळणाऱ्या देणगीवर ८० (जी) कर सवलत आहे.**

MIL KE CHALO ASSOCIATION

MIL KE CHALO ASSOCIATION


आपले हृदय कसे काम करते ?


सर या तापमापीमध्ये हे लाल रंगाचं काय आहे?


थोडावेळ मी पण टाइप करू का ?



फक्त हाडांचे आपण असे दिसतो !


कावळ्याची गोष्ट करून बघूया


डॉ. कलाम फिरती प्रयोग शाळा सत्र



# मिल के चलो असोसिएशन

ऑगस्ट 2024

